ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

मालमत्ता विभाग, दूसरा मजला, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्यालय, उल्हासनगर -४२१००३
दुरध्वनी क्रमांक २७२०११८ विस्तार २५४ फॅक्स क्र.२७२०१०४


**जा.क्र.उमपा/ मालमत्ता/ ६०४ /२०२३** **दिनांक : २० मार्च, २०२३**

## जाहिरात

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनगर येथे मालमत्ता व्यवस्थापन विभागासाठी सेवानिवृत्त्, तहसिलदार किंवा नायब तहसिलदार अथवा महापालिकेच्या सेवेतून निवृत्त् झालेले सहा. आयुक्त/ उप आयुक्त् ०१ आणि सेवानिवत्त् मोजणीदार ०२ यांची शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २७१५/प्र.क.१००/१३ दि. १७ डिसेंबर २०१६ नुसार मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी दि. २१/०३/२०२३ ते ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत सकाळी ११.०० ते सायं- ५.०० वाजेपर्यंत पात्र इच्छिूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी पात्र इच्छिुक उमेदवारांनी मालमत्ता विभाग, उल्हासनगर महानगरपालिका येथे विहित कालमर्यादेत अर्ज सादर करावे.

सदर भरती प्रक्रिया सबंधित संपूर्ण महिती व जाहिरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.umc.gov या संकेत स्थळावर व महापालिका मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे.

**मा. आयुक्त सो, यांच्या मान्यतेने**
**दिनांक- २०/०३/२०२२**

**(अशोक नाईकवाडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**

उल्हासनगरमहानगरपालिकाउल्हासनगर
मालमत्ताविभाग
Head Office, Second Floor, Ulhasangar- 421 003 Dist Thane, Maharashtra
Tel No:- 0251-2720119 Ext. No. 239 Fax No:- 0251-2720104

जा.क्र. उमपा/मालमत्ता/६०५ /२३ दि.१०/ ०३ /२०२३

## जाहीरसूचना

उल्हासनगर महानगरपलिका ,मुख्यालय, उल्हासनगर येथे मालमत्ता व्यवस्थापन विभागासाठी सेवानिवृत्त तहसिलदार किंवा नायब तहसिलदार अथवा महापलिकेच्या सेवेतून निवृत्त झालेले सहा. आयुक्त अथवा उपआयुक्त अधिका-यांच्या आणि सेवानिवृत्त मोजणीदार यांच्या सेवा करारपध्दतीने खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार विवक्षित स्वरुपाचे कामकाज करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | पटसंख्या |
|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त तहसिलदार किंवा नायब तहसिलदार अथवा महापलिकेच्या सेवेतून निवृत्त झालेले सहा. आयुक्त अथवा उपआयुक्त | ०१ |
| २ | सेवानिवृत्त मोजणीदार | ०२ |

* **विवक्षितसेवा / कामाचेस्वरुप**:--

1) उल्हासनगर महापालिका क्षेत्रात असलेल्या जागा म्हणजे, शाळा, मैदाने, गाळे, समाज मंदीरे, मोकळया जागा इ. जागा महापालिकेच्या नावे असलेल्या जमिनी, महापालिकेच्या नावे हस्तांतरीत / वर्ग करणेसाठी सबंधित मोजणी कार्यालयाचे तहसिलदार व प्रांत अधिकारी यांचेशी पत्र व्यवहार करणे.
2) उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट क्षेत्रामध्ये जे भुखंड/जमिनी चे अधिकार अभिलेखात आहेत, त्या भूखंडोचे/जमिनीचे अधिकार अभिलेखात 7/12 चा उतारा, मालमत्ता उतारा (Property Card) मध्ये महापालिकेचे नाव भोगवटादार सदरी दाखल करणे.
3) महापालिकेकडे हस्तांतरित झालेल्या जमिनीचे रजिस्ट्रेशन करणे .
4) महापालिकेकडे हस्तांतरित केलेल्या सर्व मालमत्ता महानगरपालिकेच्या नावे करणे तसेच महापालिकेच्या मालमत्तेच्या7/12 चा उतारा, मालमत्ता उतारा (Property Card) वर नोंदकरणेची कार्यवाही करणे.
5) टी. आय. एल.आर. कडून जागा मोजुन सिमांकन करुन घेणे.
6) जागेच्या मोजणी नंतर सनदेसाठी प्रांत कार्यालयाकडे सादर करणे.
7) प्रांत कार्यालया कडून सनद प्राप्तकरुन घेणे .
8) जागेमध्ये अतिक्रमणे असल्यास ती निष्कासनाची कार्यवाही करणे.
9) जागेवर बोर्ड लावून घेणे व बांधकाम विभागामार्फत जागेला कुंपन घालून घेणे.
10) सदर मालमत्तांच्या नोंदी मालमत्ता रजिस्टरला घेवून नोंद वहया अदययावत ठेवणे.
11) महापालिका विविध मिळकती/गाळे/जागा इ नियमानुसार भाडे/लिजने वितरित करणे.
12) नगररचना विभागाकडून भाडे /लिजदर प्राप्त करुन घेणे.
13) लॅण्ड अ‍ॅण्ड इस्टेट मॅनेजमेंट सॉफटवेअर विकसीत करुन घेणे.
14) भाडेकरारनामा करणे व तसेच नुतनी करणे.
15) भाडे वसूली करणे.

**अटी व शर्ती : -**

1) सदरनियुक्ती 11 महिन्याचे कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि 17/12/2016 च्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार करण्यात येणार आहे त्या नुसार मासिक परिश्रमिक अदा केले जाईल.
2) सेवानिवृत्त अधिका-याचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.
3) सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावीत सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
4) महानगरपालिकेतील सेवानिवृत्त उपआयुक्त अथवा सहा. आयुक्त यांना मालमत्ता व्यवस्थापन या विभागाचा कमीत कमी 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
5) नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यास उल्हासनगर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात काम करावे लागेल.
6) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी आयुक्त तथा प्रशासक आयुक्त, अति. आयुक्त व उपआयुक्त यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना वेळोवेळी कामकाजाचा अहवाल सादर करतील.
7) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्जसोबत जोडलेल्या नमुन्यात को-या कागदावर सुवाच्य अक्षारात लिहावा अथवा टंकलिखित करावा.
8) उमेदवाराने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांका पासून आठ दिवसांच्या आत मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका ,मुखयालय, उल्हासनगर 421 003 या पत्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना www.umcgov.inया महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने

(अशोक नाईकवाडे)
उप आयुक्त (मालमत्ता)
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

पदनाम :— ..............................................

प्रति,
मा. आयुक्त सो.
उल्हानगर महानगरपालिका,
उल्हासनगर — ३

| | |
|---|---|
| | पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवून स्वत: साक्षांकीत करावे. |

१)संपूर्ण नाव : ............................................................................

२) पत्ता : ............................................................................

............................................................................

३) दूरध्वनी क्र. : ............................................................................

४) जन्म दिनांक :— / /१९ वय :—

५) सेवा निवृत्तीचा दिनांक :— .................

६) सेवा निवृत्त झाले तेव्हाचे पदनाम :— ................

७) सेवा निवृत्त झाले तेव्हाचे कार्यालय :— ................

८) शैक्षणीक अर्हता :— ..................................

९) मोबाईल नंबर :—

१०) ई—मेल आयडी :—

१०) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत :—

१)

२)

३)

४)

५)

वर नमूद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरूध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :— सही ..........................................................

दिनांक :— ( )

---

## —: कार्यालयाने करावयाची कार्यवाही :—

वरील उमेदवाराची उपरोक्त माहिती तपासली असुन सदर पदासाठी ......................... (पात्र/अपात्र) आहे.

अपात्र कारण :— ..........................................................................................................

दिनांक : २०/०३/२०२३ अधिकारी यांची स्वाक्षरी